## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का.६,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ३०/०६/२०१६.

प्रति,
आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे.

विषय :- माहे डिसेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देण्याबाबत...

संदर्भ :- १. आपला क्र.नपाप्र/१/निवडणूक/कावि/२१६/२०१६, दिनांक २१/०६/२०१६ चा फॅक्स संदेश.
२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.७/का.६, दिनांक ०७/०५/२०१६
३. आयोगाचा समक्रमांकाचा दि.१५/०६/२०१६ रोजीचा प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम तसेच सोबतचे प्रभाग रचनेचे आदेश.

महोदय,

संदर्भाधिन अनुक्रमांक १ येथील पत्रान्वये आपण पुढील दोन मुद्दयांची धारणा पक्की करुन देण्याची विनंती केलेली आहे :-

i) नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या बाबतीत प्रारुप प्रभाग रचनेबाबत आलेले आक्षेप व सूचना यावर संबंधितांची सुनावणी घेऊन हरकत मान्य वा अमान्य करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी देतील.

ii) जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्णयास अधिन राहून अंतिम प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त हे मान्यता देतील.

२. वरील धारणेच्या अनुषंगाने आपले लक्ष राज्य निवडणूक आयोगाचे उपरोक्त संदर्भ क्रमांक २ येथे नमूद, "नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेस मान्यता देण्याबाबत अधिकार प्रदान करण्याच्या" आदेशांकडे वेधण्यात येते. या आदेशानुसार सुनावणीअंती जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार अंतिम प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त यांनी मान्यता द्यावयाची आहे.

३.	वरील आदेश लक्षात घेता आपल्या धारणेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

i) जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावावरील हरकती आणि सूचनांना सुनावणी देऊन, आपला स्वयंस्पष्ट अहवाल संयुक्तिक कारणांसह विभागीय आयुक्त यांना सादर करावयाचा आहे. जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या अहवालानुसार प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त मान्यता देतील.

ii) विभागीय आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाल्यावर अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी यांनी प्रसिध्द करावयाची आहे.

४.	तसेच उपरोक्त संदर्भ ३ येथे नमूद आयोगाच्या दि.१५/०६/२०१६ च्या आदेशातील मुद्दा क्रमांक १६ हा सुनावणीशी संबंधित आहे. जिल्हाधिकारी यांनी सुनावणीचे अधिकार हे अन्य अधिकाऱ्यांना पुन:प्रदान करु नयेत.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(ध. मा. कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- माहितीसाठी सर्व विभागीय आयुक्त.

D:\NP\Election 01.011.15.docx.RSK